## क्विक हील फाऊंडेशनचा उपक्रम

# सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' पुरस्काराचे आयोजन

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. क्विक हील फाऊंडेशन या जागतिक सायबरसुरक्षा सोल्यूशन्स प्रदाता क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडच्या सीएसआर शाखेने महाराष्ट्रातील पुणे येथे नुकताच 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा पुरस्कार'च्या २०२४ पर्वाचे आयोजन केले.

क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, जळगाव येथील कवियत्री बहीणाबाई चौधरी नॉर्थ महाराष्ट्र युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रो. व्ही. एल. महेश्वरी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रो. (डॉ.) प्रकाश ए. महानवार, महाराष्ट्र सायबरचे पोलीस अधीक्षक श्री. संजय शिंत्रे आणि २९ सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ञ यांनी उपस्थिती दाखवली.



या पुरस्कारांसाठी नामांकन महाराष्ट्र व कर्नाटकमधील ६ झोन्समधून आले, ज्यामधून या उपक्रमाचा व्यापक प्रभाव दिसून येतो. कृती, क्रियाकलाप व पोहोच प्रयत्नांसंदर्भात महाविद्यालयांकडून मिळालेल्या डेटाच्या आधारावर सायबर सुरक्षा वॉरियर्स (विद्यार्थी), सायबर सेफ्टी चॅम्पियन्स (शिक्षक) आणि सायबर शिक्षा चॅम्पियन ऑफ द इअर (संस्था) या श्रेणींअंतर्गत पुरस्कार देण्यात आले.